COTTON Innovate

Weekly Newsletter from Central Institute for Cotton Research, Nagpur

Issue 3, Volume 9, September 2018 A weekly newsletter from ICAR-CICR

## ICAR-CICR organizes farmer's awareness camp on "Integrated Management of Cotton Pink Bollworm" at Chamorshi, Dist. Gadchiroli under TSP

The widespread pink bollworm infestation on Bt cotton in Maharashtra added losses to cotton farmers during the pre year. Therefore, it was important to provide management strategies for pink bollworm devised by ICAR-Central Inst for Cotton Research, Nagpur; in new cotton crop area of tribal dominated Gadchiroli and Nandurbar districts. Ir context, one day farmer's awareness camp on "Integrated management of cotton Pink bollworm" was organized on September, 2018 at Chamorshi, Dist. Gadchiroli by ICAR-CICR in collaboration with KVK, Gadchiroli at Shikshak Pa Sabhagruh, Chamorshi, Dist- Gadchiroli under Tribl Sub Plan. Team of multidisciplinary scientists comprising of Dr Wasnik, Principal Scientist (Extension), Dr Vinita Gotmare, Principal Scientist (Plant Breeding & Genetics) and Nodal O (TSP), Dr Babasaheb Fand, Scientist (Entomology), Dr Dipak T. Nagrale, Scientist (Plant Pathology) and Mr Ram Salame (Technical Officer) addressed farmers.

Dr S M. Wasnik in his address gave detailed information about e-Kapas programme and cotton technologies for the be of cotton farmers and urged the cotton farmers to register their mobile number for getting voice messages free of from CICR regarding cotton cultivation, recommended practices and agro-advisories.

Dr. Vinita Gotmare provided information about cotton production, their marketing and TSP program for the welfa farmers in tribal dominated Gadchiroli and Nandurbar district of Maharashtra. She discussed the role of various as like selection of quality seeds, cultivation practices, crop rotation, adoption of recommended varieties etc. for enha cotton production.













Dr Babasaheb Fand briefed about past and present situation of pink bollworm and sensitized farmers about pink bollv infestation in cotton, reasons for pest infestation, integrated management practices and installation of pheromone for PBW management in fields. Also, spoke about safe handling of pesticides and drawbacks of pesticides mixture advised to spray only recommended chemicals.

Dr Dipak T. Nagrale explained various diseases during whole season of cotton cultivation in the fields, their ca identification, symptoms and integrated disease management practices.

On this occasion, Dr Sandip Karhale, Co-ordinator, KVK-Gadchiroli; Sh. Dnyaneshwar Thatod, Sh. Hemant Undirwade KVK, Gadchiroli, Sh. V. A. Rajput were also present. Pheromone Traps for monitoring infestation of Pink Bollworm distributed to 200 Tribal Farmers during this Awareness Programme. About 250 farmers from nearby villages Cham and Gadchiroli attended the programme. Mr Ramsingh Salame proposed the vote of thanks.

## Swatcch Bharat Mission

Central Institute for Cotton Research, Nagpur organised Swatch Bharat Mission programme from September 15, 2018. The programme was started by delivering pledge from Director Dr VN Waghmare followed by Cleaning of Institute area, sidewalks, roads, pavements etc. (approximately 78 officials participated in the activity) Cleaning of corridors, foyers, rooms inside the premises of the building (approximately 43 officials are participated in the activity.













An awareness program with respect to cleanliness was also organized at ICAR-CICR Regional Station, Sirsa on 15.09.2018. During this program the cleanliness activities in the premises were conducted .The programmes on "Swachha Bharat Mission" started from 15th September, 2018 to 02nd October, 2018 at Regional Station, Sirsa, Haryana also. A programme schedule for cleanliness drives / activities at various locations in and around the campus of ICAR-CICR, Regional Station, Sirsa, Haryana have been chalked out and the activities planned & performed as per the schedule.








## Newspaper coverage



लोकमत

चामोर्शीत शेतकरी प्रशिक्षण : घारगाव, मार्कंडा, भेंडाळा येथील पिकाची पाहणी

# बोंडअळी व्यवस्थापनाचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**चामोर्शी** : जिल्ह्यात कापूस पिकाखालील लागवडीचे क्षेत्र दरवर्षी वाढत आहे. शेतकरी अधिकाधिक उत्पादन घेण्याचा प्रयत्न करीत असतानाच कपाशीवर गुलाबी बोंडअळी व अन्य रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागतो. कपाशीवरील गुलाबी बोंडअळीचे एकात्मिक व्यवस्थापन व्हावे, या दृष्टीने चामोर्शी येथे बुधवारी कपाशीवरील गुलाबी बोंड अळीचे एकात्मिक व्यवस्थापन या विषयावर कार्यक्रम घेऊन मार्गदर्शन करण्यात आले.

आदिवासी उपयोजनेंतर्गत कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली आणि सीआयसीआर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी उत्पन्न बाजार समिती नजीकच्या शिक्षक सभागृहात शेतकरी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. याप्रसंगी सीआयसीआरचे डॉ. एस. एम. वासनीक, डॉ. विनिता गोतमारे, डॉ. बाबासाहेब फंड, डॉ. दीपक नगराळे, डॉ. सलामे, कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप कन्हाळे, विषय विशेषज्ज्ञ ज्ञानेश्वर ताथोड, तालुका कृषी अधिकारी व्ही. ए. राजपूत, आत्माचे हेमंत उंदीरवाडे उपस्थित होते.

संदीप कन्हाळे यांनी प्रास्ताविकातून कापसाची वाढती मागणी लक्षात घेता उत्पादनात वाढ करणे आणि अधिक उत्पन्न मिळविण्याकरिता कापूस लागवड करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. विनिता गोतमारे यांनी कापूस उत्पादनाच्या विविध संधी, बाजारपेठ याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. बाबासाहेब फंड यांनी गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी दक्षता आणि उपाययोजना सांगितल्या. तालुक्यातील घारगाव, मार्कंडा, भेंडाळा येथील कापसाच्या शेतीला भेट देऊन प्रात्यक्षिकासह माहिती देण्यात आली व शेतकऱ्यांच्या अनेक शंकांचे निरसन करण्यात आले. सोबतच प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत कामगंध सापळ्यांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी चामोर्शी तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी हजर होते.

कपाशीवरील रोगांची माहिती देताना डॉ. विनिता गोतमारे, डॉ. संदीप कन्हाळे, सोबत शेतकरी.

### कीड व रोग व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन

- डॉ. एस. एम. वासनीक यांनी कापूस लागवडीचे तंत्रज्ञान समजावून सांगत कापूस पीक नगदी पीक असल्यामुळे या पिकापासून अधिक उत्पादन घेऊन शेतकऱ्यांनी आर्थिक स्तर उंचवावा. कापसाची योग्य लागवड व व्यवस्थापन करुन अधिक उत्पादन घेता येते. किडीपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी कामगंध सापळ्यांचा वापर करण्याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. दीपक नगराळे यांनी कापूस पिकावर येणारी कीड, रोग तसेच लक्षणे, कारणे व काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

Hello Gadchiroli
Page No. 2 Sep 22, 2018
Powered by: erelego.com



पुण्यनगरी

शनिवार, २२ सप्टेंबर २०१८ । गडचिरोली

# चामोर्शीत शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

**गडचिरोली** : आदिवासी उपाययोजनेंतर्गत येथील कृषी विज्ञान केंद्र व सीआयसीआर नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कपाशीवरील गुलाबी बोंड अळीचे एकात्मिक व्यवस्थापनविषयक प्रशिक्षण शिक्षक पतपेढी सभागृह चामोर्शी येथे बुधवारी पार पडले.

यावेळी सीआयसीआर नागपूर येथील डॉ. एस. एम. वासनिक, डॉ. विनीता गोतमारे, डॉ. बाबासाहेब फंड, डॉ. दीपक नगराळे, डॉ. सलामे, डॉ. संदीप कन्हाळे, ज्ञानेश्वर ताथोड, व्ही. ए. राजपूत, हेमंत उंदीरवाडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. वासनिक यांनी कापूस लागवडीचे तंत्रज्ञान समजावून सांगितले. तसेच कापूस हे नगदी पीक असल्यामुळे कापसाचे अधिक उत्पादन घेऊन शेतकऱ्यांनी आर्थिक स्तर उंचवावे, असे आवाहन करण्यात आले. कापूस पिकाची योग्य लागवड व व्यवस्थापन करून अधिक उत्पादन घेता येते असे मार्गदर्शन केले.

डॉ. गोतमारे यांनी कापूस उत्पादनाच्या विविध संधी व बाजारपेठ उपलब्धतेबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. फंड यांनी कापूस पिकावर येणाऱ्या गुलाबी बोंड अळीचे एकात्मिक व्यवस्थापन विषयक माहिती दिली. तर डॉ. नगराळे यांनी कापूस पिकावर येणारे कीड व रोगांविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक संदीप कन्हाळे यांनी केले. प्रशिक्षणादरम्यान चामोर्शी तालुक्यातील घारगाव, मार्कंडा, भेंडाळा येथे जाऊन कापूस पीक प्रात्यक्षिकास भेट देण्यात आले. तसेच कापूस पिकाची पाहणी व शंका निरसन करण्यात आले.

सकाळ

# गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनाविषयी जनजागृती

**सकाळ वृत्तसेवा**

गिरड, ता. ३१ : सर्वत्र गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी प्रचार-प्रसार होत असला तरी शास्त्रशुद्ध माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचावी यासाठी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या पुढाकारातून समुद्रपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

येथील मगन संग्रहालयाच्या नैसर्गिक शेती विकास केंद्रात तज्ज्ञांनी गुलाबी बोंडअळीचे एकात्मिक व्यवस्थापन आणि उपाययोजना सुचविल्या. यावेळी शेतकऱ्यांना कामगंध सापळ्याचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय कापूस अनुसंधान संस्थेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सिद्धार्थ वासनिक, डॉ. नंदिनी गोगटे (नरखेडकर), वनस्पती प्रजननशास्त्र डॉ. सर्वानंद आदींची उपस्थिती होती. कापूस संशोधन केंद्राच्या संशोधनाचा आणि उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी ई-कापूस ध्वनी संदेश प्रणालीमध्ये शेतकऱ्यांनी नोंदणी करावी, असे आवाहन वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सिद्धार्थ वासनिक यांनी केले. कापूस पिकात कामगंध सापळे लावण्याच्या पद्धती आणि उपयोगिता याविषयी कीटकशास्त्रज्ञ डॉ. चीन्नाबाबू नाईक यांनी मार्गदर्शन केले. तर कापूस पिकावरील रोगांची ओळख व एकात्मिक व्यवस्थापन याविषयी डॉ. दीपक नगराळे, कीटकनाशकांची सुरक्षित हाताळणी आणि प्रमाणित औषधांचा वापर याविषयी डॉ. शैलेश गावंडे यांनी मार्गदर्शन केले. या शिबिरात गिरड परिसरातील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते. संचालन मगन संग्रहालयाचे केंद्रप्रमुख गजानन गारघाटे यांनी केले. मानस गजबे यांनी आभार मानले. आयोजनाकरिता सुरेश सेलोरे, शंकर भिसेकर, शिलास गणवीर, विष्णू ब्राह्मणवाडे, राजेंद्र बावणे, विनोद बारेकर, सचिन उरकुडे, प्रशांत मेश्राम यांनी सहकार्य केले.

Nagpur, Vardha-Today
01/08/2018 Page No. 3

# बोंड अळी व्यवस्थापनाबाबत चामोर्शी येथे प्रशिक्षण

**गडचिरोली (प्रतिनिधी)** : गडचिरोली कृषी विज्ञान केंद्र आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्यावतीने कपाशीवरील गुलाबी बोंड अळीचे व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

आदिवासी उप योजनेअंतर्गत चामोर्शी येथील पथपेटी सभागृहात हे प्रशिक्षण झाले.

केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे डॉ. एस. एम. वासनिक, वरिष्ठ नोडल ऑफीसर डॉ. विनीता गोतमारे, वरिष्ठ कीटकशास्त्रज्ञ बाबासाहेब फंड, डॉ. दीपक नगराळे, डॉ. सलामे, केव्हीके समन्वयक डॉ. संदीप कऱ्हाळे, ज्ञानेश्वर ताथोड, हेमंत उंदिरवाडे या वेळी उपस्थित होते. या वेळी संदीप कऱ्हाळे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. वासनिक यांनी कापूस लागवडीचे तंत्रज्ञान उपस्थितांना समजावून सांगितले. तसेच कापूस पिकाची योग्य लागवड व व्यवस्थापनाविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. गोतमारे यांनी कापूस लागवड आणि बाजारपेठेविषयी माहिती दिली. डॉ. बाबासाहेब फंड यांनी बोंड अळीचे एकात्मिक व्यवस्थापन याविषयी माहिती दिली. शेतकऱ्यांच्या शंकांचे या वेळी निरसन करण्यात आले. मार्कंडा, भेंडाळा, घारगाव येथील कापूस पीक प्रात्यक्षिकांची पाहणी या वेळी करण्यात आली.

Produced and Published by: Dr Vijay N. Waghmare, Director, CICR
Chief Editor : Dr. S. M. Wasnik
Associate Editor, design & Media Support : Dr. M. Sabesh
Editors: Dr Dipak Nagrale, Dr H. B. Santosh, Dr D. Kanjana , Dr. Sain, Dr Rakesh Kumar & Dr Pooja Verma,

Citation : Cotton Innovate, Issue-3 Volume-9, 2018, ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur.

Publication Note: This Newsletter presented online at http://www.cicr.org.in/cotton_innovate.html

Cotton Innovate is the Open Access CICR Newsletter

The Cotton Innovate – is published weekly by ICAR-Central Institute for Cotton Research
Post Bag No. 2, Shankar Nagar PO, Nagpur 440010
Phone : 07103-275536; Fax : 07103-275529;
email: cicrnagpur@gmail.com, director.cicr@icar.gov.in